बीड (महाराष्ट्र) | वर्ष ३ रे | अंक ३४६ | सोमवार, दि. १८ मार्च २०२४ | RNI-MAHMAR/2021/80074 * Post: Reg.No L/164/RNP/Beed 2022-24 | पान १ | पाने ४ | किंमत ३ रूपये

Beed (Maharashtra) | Year 3 | Issue 346 | Monday 18 march 2024 | RNI-MAHMAR/2021/80074 * Post: Reg.No L/164/RNP/Beed 2022-24 | Page 1 | Pages 4 | Price 3

मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

बीड | datta.namale@gmail.com | dailymarathwadapatra2021@gmail.com | epaper : https://marathwadapatra.com | Eportal-https://marathwadapatra.com | Mo. 9822152955

बीड लोकसभेला तांबाराजुरी ग्रामस्थ देणार उमेदवार

संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटलांच्या आदेशाची वाट पाहतय तांबाराजुरी गाव

पाटोदा (प्रतिनिधी) –लोकसभा निवडणूक २०२४ च्या निवडणुकीच्या घोषणा होताच मराठ्यांचे उमेदवार रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. गावागावांच्या बैठका सुरू झाल्यात प्रत्येक गावामधून उमेदवार देणार आणि मराठ्यांना सगेसोयरे कायदा लागू करणार आणि हक्काचा आरक्षण मिळवणार अन्याया लोकसभेला प्रत्येक गावातून उमेदवार दिला जाणार असं प्रत्येक गावामध्ये टोकाचं पाऊल उचलताना मराठा समाज दिसत आहे. पाटोदा तालुक्यातील तांबाराजुरी गावातील ग्रामस्थांनी बैठक घेऊन लोकसभेला आपल्या गावातील दोन उमेदवार द्यायचे असं निश्चित केले आहे. परंतु संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटलांच्या आदेशाची वाट पाहत आहोत त्यांचा आदेश आला तर लगेच रिंगणात उतरणार असेही सांगण्यात आले आहे.मराठ्यांना आरक्षण मिळवण्यासाठी मराठ्यांनी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटलांच्या खांद्याला खांदा लावून लढाईमध्ये झोकून दिला आहे. कोटीने मराठे एकत्र येऊन पाटलांच्या सोबतीला उभे राहिले आहेत. मराठा समाजाला ओबीसीतून कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावेत आणि सगे सोयरे कायद्याची अंमलबजावणी करण्यात यावी यासाठी सध्या संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील महाराष्ट्रभर फिरत आहेत. सरकार गंभीर्यानि दखल घ्यायला तयार नाही, यासाठी वेगाच्या निवडणुकीमध्ये प्रत्येक गावातून लोकसभेला किमान दोन उमेदवार देऊन सरकारला धारेवर धरायचं असं टोकाचे पाऊल मराठा समाजामधून उचललेलं दिसत आहे, परंतु संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचा आदेश पाळणार असल्याचं मराठा समाजामधून बोललं जात आहे. पाटलांचा आदेश आला तर प्रत्येक गावातून दोन उमेदवार आणि नाही आला तर शांत बसू आणि जो मराठ्यांच्या हितासाठी लढला असेल आणि जरांगे पाटील सांगतील त्यालाच मतदान करून निवडून आणू असाही ठाम गाव–गावच्या मराठा समाजानी निर्धार केला आहे. पाटोदा तालुक्यातील तांबाराजुरी गावातील ग्रामस्थांनी देखील बैठक घेऊन उमेदवार देण्यान निश्चित केलं असले तरी जरांगे पाटलांचा आदेश आला तर उमेदवार उभे करू अन्यथा जरांगे पाटील सांगतील त्याला एक शिक्षणाने मतदान करू आणि निवडून आणू असे देखील एक मुखाने ग्रामस्थांनी ठरवले आहे.

राजकीय पक्षांनी आदर्श आचारसंहितेच्या मार्गदर्शक तत्वाचे पालन करावे-जिल्हाधिकारी

बीड, (प्रतिनिधी)- लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या काळात ३९-बीड लोकसभा मतदार संघात आदर्श आचार संहिता लागू झाली असून राजकीय पक्षांनी आणि प्रतिनिधीनी त्याच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीची बैठक झाली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव निवडणूक उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी अंजू निमसरकर आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले, निवडणूकीसाठी नामनिर्देशनपत्र दाखल करतांना उमेदवारांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ५ प्रतिनिधींनां प्रवेश देण्यात येईल यासाठी सोबत अणावयाची वाहने, आदीप्रसंगी आचार संहितेनुसार बंधने पाळली जावीत. राजकीय पक्षाशी निगडित विविध मंजुरी एक खिडकी मधून दिली जाणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

यासह राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्यावरील टीका त्यांची घोरणे कार्यक्रम पूर्वीची कामगिरी आणि कार्य यांच्याशी संबंधित असावी. शांततापूर्ण आणि उपद्रव रहित जीवन जगण्याचा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार आहे त्या अधिकाराचे निवडणुकीच्या काळात पण जतन व्हावे अशी अपेक्षा जिल्हाधिकारी यांनी यावेळी व्यक्त केली. सभेसाठी लागणाऱ्या प्रत्येक गोष्टींची पूर्वपरवानगी घेण्यात यावी. सभांमध्ये सुव्यवस्था बिघडणार नाही यासाठी पोलीस बंदोबस्तची मदत घ्यावी.

मतदानाच्या दिवशी उमेदवार व त्यांची निवडणूक मतदान प्रतिनिधी याव्यतिरिक्त फक्त निवडणूक आयोगाकडून वैद्य प्राधिकार पत्र मिळालेल्या व्यक्तींनाच कोणत्याही मतदान कक्षा प्रवेश करता येईल इतर व्यक्ती ▶▶ पान २ वर

श्री क्षेत्र नारायण गडासाठी २४ कोटीचा तीर्थक्षेत्र विकास निधी मंजूर

गडाचे महंत ह.भ.प.शिवाजी महाराज यांच्याकडे शासन निर्णय सुपूर्द केला

नारायणगडासाठी आलेल्या निधीसाठी कोणत्याही क्षीरसागरांचा योगदान नाही-अनिल जगताप,सचिन मुळूक

बीड/प्रतिनिधी: धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नगद नारायण गड येथील विकास व्हावा, अशी भक्तांची मागणी होती. या मागणीच्या पाठपुराव्यानंतर आता २४ कोटी रूपयांच्या विकास आराखड्यास दि.१५ मार्च रोजी सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. यामुळे आता नारायण गड्याचा कायापालट होणार आहे.सन २०१८ मध्ये स्व.विनायक मेटे यांनी पुढाकार घेवून धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नगद नारायण गड येथील विकास कामात लक्ष घातले . तत्कालीन पालकमंत्री

पंकजा मुंडे यांच्या काळात त्याच काळात २५ कोटी रूपयांचा आराखडा तयार करण्यात आला होता. त्यास तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांनी मंजूरी दिली आणि अडीच कोटी रूपयांचा निधी देखील वर्ग केला. पुढे सरकारमध्ये बदल झाला आणि मंजूर आराखड्यास निधी मिळालेला नाही. यानंतर शिवसेनेचे जिल्हाप्रमूख सचिन मुळूक, गडाचे विश्वस्त अनिल जगताप, विश्वस्त बळीराम गवते, बी.बी.जाधव, गोवर्धन काशीद आणि सर्वच मंडळींनी नारायण गडचे महंत शिवाजी बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली उर्वरित निधी आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. मागील काही महिन्यांपासून यासाठी पाठपुरावा सुरू होता. अखेर दि.१५ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस, ▶▶ पान २ वर

सेवानिवृत्त पत्रकारांचे मानधन ११ वरून २० हजारांवर

'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या सातत्यपूर्ण लढ्याला मोठे यश

मुंबई (मराठवाडा पत्र) : देशभरातील पत्रकारांच्या समस्यांकडे लक्ष वेधून त्या शासनदरबारी मांडणाऱ्या 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या रेट्यामुळे शासनाने राज्यातील सेवानिवृत्त पत्रकारांच्या मानधनात दुपटीने वाढ केली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून 'व्हॉईस ऑफ मीडिया'ने यासंदर्भात आवाज उठवला होता. अखेर आज शासनाने याबद्दलचा जीआर काढून हा विषय मार्गी लागला, असे सांगितले आहे. 'व्हॉईस ऑफ मीडिया'ला मिळालेल्या यशाबद्दल राज्यभरातल्या अनेक जिल्ह्यांच्या ठिकाणी पेढे वाटून, फटाके फोडून पदाधिकारी, पत्रकार यांनी आनंद व्यक्त केला आहे.

देश–विदेशात क्रमांक एकची पत्रकार संघटना असलेल्या 'व्हॉईस ऑफ मीडिया'ने सेवानिवृत्त पत्रकारांचा मानधन वाढीबाबतचा विषय शासनाकडे रेटून धरला होता. नुकतेच झालेले हिवाळी अधिवेशन, त्या अगोदर तीन वेळा 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या वतीने धरणे आंदोलन केल्यानंतर शासनाने पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेऊन एक समिती स्थापन केली होती. यावेळी संघटनेने पत्रकारांच्या आरोग्य, मुलांचे शिक्षण, निवासाचा प्रश्न, निवृत्ती वेतनाचा प्रश्न यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सकारात्मक तोडगा काढण्याची मागणी केली होती. पत्रकारांच्या आरोग्य योजनेत देखील भरीव वाढ करण्याची मागणी केली होती. संघटनेच्या वापूर्वी करण्यात आलेल्या विविध आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सातत्याने ▶▶ पान २ वर

होळकर शाहीचे संस्थापक सुभेदार मल्हारराव होळकर जयंती साजरी

लिंबागणेश (मराठवाडा पत्र) – बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामस्थांच्या वतीने दि.१६ मार्च शनिवार रोजी होळकर शाहीचे संस्थापक सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या ३३१ व्या जयंतीनिमित्त प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत श्रीफळ फोडून मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. मल्हारराव होळकर यांचा जाज्वल्य इतिहास युवकांना प्रेरणादायी असुन विविध उपक्रमांद्वारे लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे प्रतिपादन डॉ.गणेश ▶▶ पान २ वर

बोरबन येथील तृतीय अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

बीड (मराठवाडा पत्र)- बीड जिल्ह्यातील अंजनवती ही श्री संत तुकाविप्र महाराज यांची जन्मभूमी आहे. येथील अमरजा नदीच्या काठावर पुरातन मठ आहे याच प्रमाणे सातारा जिल्ह्यात कोरेगाव तालुक्यातील तारगाव येथे कृष्णेच्या काठावर श्री संत तुकाविप्र महाराजांचा भव्य मठ असून याच ठिकाणाला श्रीक्षेत्र बोरबन म्हणून संबोधले जाते या ठिकाणी महाशिवरात्रीचे औचित्य साधत भाविकभक्तांकडून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले गेले. यावेळी किर्तनाला मठाधिपती कुमार महाराज

विप्र,श्री संत तुकाविप्र महाराज पालखी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अर्जुन महाराज पाटील, गोवर्धन(मिठु) महाराज कोरडे यांच्यासह दोन्हीही धार्मिक स्थळाममधील ग्रामस्थ व भक्तगण उपस्थित होते.

यावेळी तुकाविप्र महाराजांचे वंशज कुमार महाराज विप्र यांनी काल्याचे किर्तन करताना ▶▶ पान २ वर

पंकजा मुंडे यांना देशात सर्वाधिक मताधिक्याने विजयी करणार–आ.प्रकाश सोळंके

माजलगाव मतदार संघात विविध विकास कामांना मंजुरी



माजलगाव (मराठवाडा पत्र)लोकसभेचा बिगुल वाजण्यास सुरुवात झाली आहे.आज केव्हाही आचार संहिता जाहीर होऊ शकते. दरम्यान बीड लोकसभा उमेदवारी माजी मंत्री पंकजा मुंडे यांना जाहीर करण्यात आली असून त्यांना देशात सर्वाधिक मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार आ. प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केला. शनिवार दि.१६ रोजी दुपारी सोळंके महाविद्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही घोषणा केली.दरम्यान माजलगाव मतदार संघात मंजूर करण्यात आलेल्या विविध विकास कामाची त्यांनी पत्रकारांना माहिती दिली.

यावेळी त्यांनी पत्रकारांना सांगितले की एमआयडीसीत १७ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना. क्रीडा संकुलासाठी ५ कोटी. केशवराज मंदिराच्या पुनर्बांधणी साठी ९ कोटी ४५ लाख.मनुर गोविंदपुर,मोठेवाडी,खाडेवाडी, शिंदेवाडी,चोपनवाडी या रस्त्यांसाठी मुख्यमंत्री सडक योजनेत ▶▶ पान २ वर

सुशीला साळवी यांचे निधन

बीड (प्रतिनिधी) – शहरातील जवाहर कॉलनी भागातील रहिवासी



सुशीला भीमराव साळवी यांचे वृद्धापकाळाने रविवारी सकाळी निधन झाले. मृत्यू समयी त्या ८५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर अंकुश नगर भागातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. एडवोकेट साजन साळवी, इंजिनियर अनिल साळवी यांच्या त्या आई होत.

जागतिक संत संमेलनासाठी शिवाचार्य महाराजांना आमंत्रण

परळी (प्रतिनिधी) – येथील जगद्गुरू पलसिध्द महास्वामी पिठाचे २८ वे मठाधिपती सिध्दचैतन्य शिवाचार्य महाराज यांना १४ मार्च पासून सुरू होणार्या जागतिक स्लोबल आध्यात्मिक महोत्सवात आमंत्रित करण्यात आले आहे.

हार्टफुलनेसचे आंतरराष्ट्रीय मुख्यालय, भारतातील चेगुर गावाजवळ स्थित कान्हा शांती वनम, चौदाशे एकरमध्ये पसरले अस्सू जगातील सर्वात मोठे ध्यान हॉल आहे. रंगा रेड्डी जिल्ह्यातील हैदराबादपासून ५० किलोमीटर अंतरावर असलेल्या कॅम्पसमध्ये सुमारे ४० हजार सहभागी सामावू घेऊ शकतात. भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालय, हार्टफुलनेसच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवाचे उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमाला उपराष्ट्रपती जगदीप धनकर, कमलेश पटेल, एसआरसीएम बाबा रामदेव, माता अमृतानंद मायल, हरजिंदर सिंग धामी एससीपीसी, गोविंद गिरी महाराज गीता परिवार, डॉ. इमाम उमर अहमद इत्यासी, चित्रा जेयर बहेणि शिवानी ब्रह्मा कुमारी, आचार्य लोकेश, ओसवाल्ड ग्रेशियस, डॉ. जयंती एस. रवी ऑरविले फाउंडेशन, सद्गुरु ईशा फाउंडेशन श्री श्री रविशंकर, वेन गेशे दोरजी तिबेट हाऊस श्रीमंत स्वामी गौतमानंद, आरके मिशन बीके मृत्युंजय, ब्रह्मा कुमारिस, स्वामी चिदानंद परहर्थ निकेतन, श्री राकेश भाल एसआरसीएम जैन, पूज्य आनंद भन्ते, बौद्ध भिक्षु, शेखर कपूर, व्यंकटेश अभिनेता आणि निर्माता, अभिनेत्री कृती शेट्टी, शेखर कपूर, शंकर महादेवन उपस्थित राहणार आहेत. यामध्ये शंभर देशातील संत सहभागी होणार होणार आहे. जगभरातील दहा लाख भाविक या संमेलनात सहभागी होणार आहेत.

तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्रात ५१ महिलावर बिन टाका शस्त्रक्रिया संपन्न

तलवाडा (मराठवाडा पत्र)- गेवराई तालुक्यातील तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत ४५ गावाचा समावेश आहे.या गावातील महिला कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यासाठी तलवाडा प्रथमिक आरोग्य केंद्रात नोंद करतात तर दर महिन्याला बिन टाका कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया कॅंम्प ठेवण्यात वेत आहे. आज दि.१६/३/२०२४ रोजी सकाळी बिन टाका कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया कॅंम्प ठेवण्यात आला होता या कॅंम्पमध्ये ५१ महिलावर बिन टाका कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.यावेळी

डॉ धनाजी बनसोडे ,डॉ पूजाताई शेळके , डॉ अक्षय खरवडे , डॉ. नितीन काकड , तर सर्जन म्हणून स्त्री रोग तज्ञ डॉ शिवनाथ वाघमारे,

या कॅंम्प यशस्वी करण्यासाठी धुरवडे आण्णा , केदार , श्रीमती घोंगडे मॅडम , प्रदिप राऊत ,खटके , साळवे , शुभम राऊत , वाघमारे , लहू नन्वके , नाटकर श्रीम. जाधव , श्रीम . मस्के , श्रीम गायकवाड , श्रीम बोरडे , गालफाडे , आतमवाड , श्रीम. मुंडलीक . श्रीम.मिटकर, शेख गफार, आशा वर्कर,यांनी सहकार्य केले.

संपादकीय

पेपर फुटी

दोन महत्त्वाच्या परीक्षा केवळ पेपरफुटीमुळे रद्द करण्याची वेळ सरकारांवर येत असेल तर याबाबतच्या सरकारी क्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणारच..

पायाभूत सोयीसुविधांची उभारणी प्रगतीसाठी महत्त्वाची खरीच. रस्ते, महामार्ग, अतिजलद महामार्ग, रेल्वे, वीज, विमानतळ, बंदरे यांच्या जोडीने अलीकडच्या काळात आवश्यक अशा इंटरनेट सोयीसुविधा आदी पुरवणे हे सरकारांचे कर्तव्यच. या सगळ्याचे वर्णन 'भौतिक सोयीसुविधा' (फिजिकल इन्फ्रास्ट्रक्चर) असे करता येईल. हे आवश्यकच. पण याच्या जोडीने किंबहुना यापेक्षाही अधिक आवश्यक असतात त्या संस्थात्मक सोयीसुविधा (इन्स्टिट्यूशनल इन्फ्रास्ट्रक्चर). या संस्थात्मक सोयीसुविधांतील कर्मचारी भौतिक सोयीसुविधा हाताळण्यात निर्णायक भूमिका बजावत असतात. म्हणजे महामार्ग उत्तम बांधला; पण वाहतुकीच्या प्रामाणिक नियमनासाठी मनुष्यबळ निर्माण केले नाही तर उत्तम महामार्ग बांधणीची रास्त फळे मिळत नाहीत. उत्तम शैक्षणिक सुविधा- म्हणजे चकचकीत महाविद्यालये, त्यात पंचतारांकित सुविधा इत्यादी- उभ्या केल्या. पण विद्यार्थ्यांच्या मूल्यांकनासाठी चोख परीक्षा पद्धत, उच्च दर्जाची शैक्षणिक सुविधा आणि ते शिक्षण देणारा गुणवंत अध्यापकवर्ग नसेल तर नुसत्या इमारतींचा काहीही उपयोग होत नाही. याअभावी कंत्राटदारांस काम तेवढी मिळतात आणि ती देण्यात ज्यांचे हितसंबंध असतात त्यांचे उखळ पांढरे होते. हा आनंद तात्पुरता. कारण या सगळ्याचा उपयोग उच्च दर्जाचे शिक्षण देण्यात, ते आत्मसात करून बौद्धिक आव्हाने पेलू शकणाऱ्या विद्यार्थ्यांत होणार नसेल तर भौतिक सोयीसवलती म्हणजे केवळ सांगाडे. प्राणशून्य सांगाडयांचा ज्याप्रमाणे काहीही उपयोग नसतो त्याप्रमाणे या सोयीसवलतींचा उपयोग फक्त 'छान दिसते' इतके म्हणण्यापुरता. पुढची पिढी घडवण्यास हे सारे निरुपयोगीच. हा सारा ऊहापोह आता करण्याचे कारण म्हणजे उत्तर प्रदेशात महाभरतीसाठी आणखी एक परीक्षा रद्द करण्याची सरकारवर आलेली वेळ. ती वेळ त्या सरकारवर आली कारण संबंधित परीक्षांचे पेपर फुटले. महाराष्ट्रातही असे काही प्रकार अलीकडच्या काळात घडले. सबब या विषयाची दखल घेणे गरजेचे ठरते.

अलीकडच्या काळात उत्तर प्रदेश सरकार वृत्तविषय झाले ते पोलीस कॉन्स्टेबलच्या व्यापक भरतीच्या वृत्ताने. बऱ्याच काळाने होणाऱ्या या भरतीत जवळपास ६० हजार पदे भरली जाणार होती आणि सुरुवातीच्या वृत्तानुसार या कनिष्ठ श्रेणीतील भरतीसाठी जवळपास ६० लाख इतके महाप्रचंड संख्येत अर्जदार होते. ही संख्या सिंगापूर देशाच्या लोकसंख्येपेक्षाही अधिक. उत्तर प्रदेशातील सार्वजनिक वाहतूक यंत्रणा या परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या गर्दीने नुसती दुपटून गेली होती. प्रत्यक्ष परीक्षादिनी या ६० लाखांतील ४८ लाख परीक्षा केंद्रांवर हजर झाले. तथापि या परीक्षार्थींस निराश होऊन परतावे लागले कारण त्यातील एक पेपर फुटल्याने सगळी परीक्षाच रद्द करण्याची नामुष्की सरकारवर आली. त्यानंतर हा प्रकार पुन्हा घडला.

गेल्या शनिवारी उत्तर प्रदेशात त्या राज्याच्या लोकसेवा आयोगातील विविध पदे भरली जाणार होती. उत्तर प्रदेश लोकसेवा आयोगातील रिव्ह्यू ऑफिसर, असिस्टंट रिव्ह्यू ऑफिसर आदी पदांसाठी परीक्षा होती. अशी किती पदे रिक्त होती? तर फक्त ४११. तथापि या अवघ्या ४११ पदांसाठी १० लाख ७ हजार अमेदवारांचे अर्ज आले. यातील किती प्रत्यक्षात परीक्षा केंद्रांवर दाखल झाले याचा तपशील उपलब्ध नाही. परंतु परीक्षा सुरू होत असतानाच समाजमाध्यमांवर काही प्रश्नपत्रिका उपलब्ध झाल्या. फुकट फॉवर्डींची संख्या त्या राज्यातही मुबलक असल्याने हे प्रश्न सर्वदूर पसरले. अशा वेळी उत्तर प्रदेश सरकारची प्रतिक्रिया अन्य कोणत्याही सरकारप्रमाणे निघाली. सरकारने पुरावा मागितला. अनेकांनी तो सादर केला. खुद्द प्रयागराज येथे या संदर्भात निदर्शने झाली. अखेर त्याची दखल घेऊन मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावर हा दुसरा परीक्षायोगही रद्द करण्याची वेळ आली. ''परीक्षेच्या पावित्र्याशी छेडछाड करणाऱ्यांस'' योग्य तो धडा वगैर शिकविण्याचा इशारा त्यांनी दिला. ते होईल तेव्हा होईल. पण तोपर्यंत या राज्याच्या साऱ्या अमेदवारांच्या नशिबी पुन्हा एकदा वाट पाहणे आले. आधीच जवळपास ४८ लाख उमेदवार ६० हजार पदांच्या भरतीकडे बुभुक्षित नजरेने पाहत आहेत. त्यात आता ही आणखी दहा लाखभरांची भर. शक्य आहे की काही उमेदवारांनी या दोन्ही परीक्षांत अर्ज भरले असतील. म्हणजे त्यांची दुहेरी उपेक्षा. इतक्या महाप्रचंड संख्येने विद्यार्थी, तरुण उपेक्षित राहत असतील तर ही परिस्थिती गंभीर मानली जायला हवी. आणि त्यातही हे राज्य उत्तर प्रदेश असेल तर अधिकच. कारण 'विकसित भारत'चा संकल्प घेऊन पुढे निघालेले देशाचे सर्वोच्च सत्ताधीश या राज्याचे प्रतिनिधित्व करतात. तसेच हे देशातील सर्वात मोठे राज्य. समस्त युरोपीय देश जरी एकत्र आले तरी उत्तर प्रदेश त्या सर्वास भारी पडेल, अशी त्याची क्षमता. आताही भारतास पाच लाख कोटी डॉलर्सची अर्थव्यवस्था करण्याच्या केंद्रीय नेत्यांच्या मनसुब्यांत या राज्याचा वाटा अतिशय मोठा असल्याचे आपणास सांगितले जाते. उत्तर प्रदेश राज्य लवकरच कसे एक लाख कोटी डॉलर्सची अर्थव्यवस्था असलेले पहिले राज्य होईल, हेदेखील आपणावर बिबवले जात असते आणि विविध उद्योग मेळाव्यांत कित्येक लाख कोटींचे सामंजस्य करार होऊन उद्योगपतींत त्या राज्यात उद्योग स्थापन करण्यासाठी कशी अहमहमिका सुरू आहे याचेही वृत्तांत सातत्याने येत असतात. त्या राज्याची सूत्रे असलेले योगी असल्याने या सगळ्याच्या सत्यासत्यतेबाबत शंका घेण्याचे अजिबात कारण नाही. तेव्हा मुद्दा त्या राज्याच्या क्षमतेचा नाही. तो आहे फक्त त्या राज्यातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याच्या सरकारच्या क्षमतेचा. पाठोपाठ दोन महत्त्वाच्या परीक्षा केवळ पेपरफुटीमुळे रद्द करण्याची वेळ सरकारांवर येत असेल तर या परीक्षा घेण्याबाबत सरकारी क्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणारच होणार. हा असा प्रकार आपल्या महाराष्ट्रातही अलीकडे घडल्याची टीका होते. तलाठी आणि अन्य काही परीक्षांचे पेपर फुटले आणि त्यात परीक्षा घेण्याची जबाबदारी असलेल्या खासगी कंपनीतील कर्मचारी गुंतले होते, असेही पुढे आले. उत्तर प्रदेशात या नोकरभरतीसाठीची प्रक्रिया संपूर्णपणे त्या राज्याच्या लोकसेवा आयोगाकडूनच राबवली जात होती की तिकडेही एखादी खासगी कंपनी गुंतलेली होती याचा तपशील अद्याप स्पष्ट नाही. तशी ती असेल वा नसेलही. पण तरीही महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश या राज्यांत पेपरफुटीबाबत साम्य दिसते.

वारस प्रमाणपत्राबद्दल जाहीर घोषणा
गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश क.सस्स्तर
श्री.कौस्तुभ नागेश मराठे यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : २०२/२०२४
हरिबाई विरूध्द निरंक
(मार्फत : अंड.जी.एम.रोटे यांच्या मार्फत)

ज्याअर्थी मयत नाम नारायण पि.गेनु परझणे (परजणे) हे दि.३०/६/२०१३ रोजी मौजे खळेगाव ता.गेवराई जि.बीड येथे मयत झाले आहेत.
अर्जदार १) हारिबाई नारायण परजने (परझणे) रा.खळेगाव ता.गेवराई जि.बीड २) गणेश नारायण परजने (परझणे) रा.सदर ३) रंजित नारायण परजने (परझणे) रा.सदर
शासकीय / निमशासकीय कामासाठी कायदेशिर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.
त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे सदरहु मयताचे कायदेशिर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणने असेल तर ह्या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसांचे आत त्यांने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून अससेही कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नाम नारायण पि.गेनु परझणे (परजणे) रा.खळेगाव ता.गेवराई जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
आज दि.१३/३/२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले
पुढील तारीख २४/४/२०२४

शिक्का

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय
क.स्तर गेवराई

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर
गेवराई

जाहिर प्रगटन
मा.श्रीमती के.सी.बागल ८ वे दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड याचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज नंबर : ३२८/२०२४
(अॅड.डी.एम.रोटे यांच्या मार्फत)
गोपाल व इतर वि.निरंक

ज्यापेक्षा शकुंतला भरत उर्फ भारत गोले रा.दत्त मंदीर चौरे गल्ली बीड ता.जि.बीड हे दि.२४/८/२०२३ रोजी मयत झाल्या आहेत आणि तसेच अर्जदार १) गोपाल भरत उर्फ भारत गोले रा.चुन गल्ली दत्त मंदीराजवळ बीड ता.जि.बीड २) अनिल भरत उर्फ भारत गोले रा.सदर ३) सुनिता शामसुंदर मंत्री रा.बालाजी तारी नगर, बोडुप्पल घाटकेसर मंडल ता.जि.रगारेड्डी (आंध्रप्रदेश) ५०००९२ हे.मू.चंपावती क्रिडा मंडळाच्या मागे, वाझवल्क्य नगर बीड ता.जि.बीड ४) संगिता किशोर पुष्पाला रा.गणेश मंदीर जवळ आनंदवाडी सटना रोड मनमाड ता.नांदगाव जि.नाशिक ५) सविता रविंद्र नाटेकर रा.चंपावती क्रिडा मंडळाच्या मागे वाझवल्क्य नगर बीड
अर्जदार क्र.१ व २ हे मयत शकुंतला भरत उर्फ भारत गोले यांचे मुले असुन अर्जदार क्र.३ ते ५ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. या अर्जदाराव्यतीरीक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदाराचे म्हणने आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळवण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.
त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे सदरहु मयताचे कायदेशिर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणने असेल तर ह्या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्यांने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून अससेही कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांनना सदर मयत नामे शकुंतला भरत उर्फ भारत गोले यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
आज दि.१७/२/२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले
पुढील तारीख २३/४/२०२४

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक

शिक्का

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर
बीड

उत्तराधिकार प्रमाणपत्राबद्दल जाहीर घोषणा
गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश क.सस्स्तर
श्री.ए.डी.कुलकर्णी यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : १३९/२०२४
समलना विरूध्द निरंक
(मार्फत : अॅड.डी.एम.रोटे गेवराई)

ज्याअर्थी मयत नाम शेखख हशमतबी भ्र.जमाल उर्फ काराभारी हे दि.१०/५/२०१३ रोजी रा.पिंपळगाव कानडा ता.गेवराई जि.बीड येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१ मयत भ्र.इब्राहीम शेख वय ५० वर्षे धंदा घरकाम रा.पिंपळगाव काना ता.गेवराई जि.बीड २) शेखख मोहसीनन पि.इब्राहीम वय ३१ वर्षे, धंदा शेती रा.पिंपळगाव कानडा ता.गेवराई जि.बीड यांनी सदरहु मयताच्या नावे खालील प्रमाणे रक्कम जमा आहे.
बँकेचे नांव : भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा हिंगपुर ता.गेवराई जि.बीड
बचत खातते क्रमांक : ६२१९०९७३१११३
रूपये : ८३,५४५/-

वरील रक्कम मिळणेकामी अर्जदार यांना उत्तराधिकार प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता भारतीय वारस कायदा कलम ३७२ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणे असा अर्ज त्यांनी या न्यायवालययाकडे केला आहे.
त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे सदरहु मयताचे कायदेशिर उत्तराधिकारी नव्हेत असे कोणाचे म्हणने असेल तर ह्या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्यांने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून अससेही कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे शेख हशमतबी भ्र.जमाल उर्फ काराभारी यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
आज दि.१६/२/२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले
पुढील तारीख २७/३/२०२४

शिक्का

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय
क.स्तर गेवराई

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर
गेवराई

वाशिम जिल्ह्याचे नामांतर संत सेवालाल नगर करा- अॅड.चव्हाण

बीड (प्रतिनिधी)- भारतातील बंजारा समाजाचे आणि गोर गरीब वंचित असलेल्या ओबीसी, भटक्या आणि बहुजन समाजाचे थोर समाजसुधारक, राष्ट्रसंत सेवालाल महाराज यांच्या पदस्पर्शनि पावन झालेल्या वाशिम जिल्ह्याचे नामांतर करुण संत सेवालाल नगर असे नामकरण करावे अशी मागणी माजी जिल्हा परिषद् सदस्य अॅड.शरद चव्हाण यांनी केली आहे.

बंजारा समाजासह आठरा पगड जातीच्या लोकांना विज्ञानाच्या वाटेवर चालण्याचा मार्ग दाखविण्याचा प्रयत्न सेवालाल महाराज यांनी केला आहे. सेवालाल महाराज यांनी समाजातील वाईट चालीरितीच्या विरोधात काम केले त्याचप्रमाणे या समुदयाला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. भारतातीलच नव्हे तर देशातील बंजारा समाज हा संत सेवालाल महाराज यांना आपले श्रद्धास्थान समजतो. महाराष्ट्रात बंजारा समाजाची लोकसंख्या निर्णायक आहे. विदर्भात तर बंजारा समाज सर्वाधिक आहे. वाशिम जिल्ह्यातील मानोरा तालुक्यातील पोहारदेवी या ठिकाणी सेवालाल महाराज यांचे समाधीस्थळ असुन या ठिकाणी सेवालाल महाराज यांच्या समाधीस्थळी नतमस्तक होण्यासाठी देशभरातील बंजारा समाज बांधव प्रत्येक वर्षी येऊन नतमस्तक होत असतो. तरी वाशिम जिल्ह्याचे नामांतर करुण संत सेवालाल नगर असे नामकरण झाले तर वाशिम जिल्ह्यासह महाराष्ट्राची मान अभिमानाने देशपातळीवर उंचावणार आहे. ज्या पद्धतीने मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या नामांतरासाठी पंधरा वर्षे आंदोलने करण्यात आली त्याच धर्तीवर आज पासून वाशिम जिल्ह्याचे नामांतर करुण संत सेवालाल नगर असे नामकरण करण्यासाठी लढा उभा केला जाणार असून या आंदोलनात बंजारा समाजाच्या बांधवासह सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन लढा सुरू करणार असल्याचे जिल्हा परिषद् सदस्य अॅड.शरद चव्हाण यांनी केले आहे.

पान १ वरून...

बोरबन येथील तृतीय ....

सांगितले

की अखंड हरिनाम सप्ताहातील काला म्हणजे कृषी प्रधान संस्कृतीचे प्रतिक असून भगवान श्रीकृष्ण हे राजपुत्र असूनही पेंद्या, वाकड्या, लंगड्या, सुदामा आदी सर्वसामान्य कुटुंबातील गुराखी सवंगड्यांची शिदोरी जमा करुन त्याचा एकत्रित काला बनवुन सर्वांनी भक्षण केला यावेळी भेदभाव विसरून एकत्रित केलेल्या तत्कालीन काल्याची आजही सर्वत्र अखंड हरिनाम सप्ताहात उजळणी करून समाजात एकोपा नांदावा हा संदेश आपण देत असतो असे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी उपस्थित मान्यवर व बीड, सातारा तसेच महाराष्ट्रातील विविध ठिकाणावरुन आलेल्या भाविक भक्तांबद्दल अंजनवती येथील बाळासाहेब मोरे म्हणाले की कुमार महाराज विप्र यांनी शासकीय सेवा करत असताना समाजीक बांधीलकी जोपासली असून पगारातील पाच लक्ष रुपये खर्चून तुकाविप्र महाराजांचे अडगळीत पडलेले अध्यात्मिक साहित्य ग्रंथरूपाने समाजासमोर आणण्याचे पवित्र कार्य केले आहे संत आनंदराव येडे महाराजांनी अंजनवती व पंचक्रोशीतील नागरिकांना बोरबन ठिकाणाची ओळख करून देण्याचे काम केले.

श्री संत तुकाविप्र महाराज पालखी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अर्जुन महाराज पाटील यांनी कै. प्रभाकर बाबा विप्र व कै.भानुदासबुवा विप्र यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केलेला श्रीक्षेत्र पंढरपूर व श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळा गेली २३ वर्षापासून अथक परिश्रमातून टिकवून ठेवण्याचे कार्य केले असून पंचेविसावा वर्षपुर्ती सोहळा अंजनवती व तारगाव येथील नागरिकांच्या सहकार्यातून भव्य स्वरूपात साजरा करण्यात येईल जेणेकरून अंजनवती व बोरबन ही दोन्ही अध्यात्मिक ठिकाणे महाराष्ट्राच्या नकाशावर येतील तारगावचे सरपंच लक्ष्मण (तात्या)निकम त्यांचे सहकारी व गावकर्यांनी तन-मन-धनाने या सप्ताहाला सहकार्य केले अंजनवतीचे सुसंस्कारीत सरपंच कैलासदादा येडे राजकीय क्षेत्रा बरोबरच अध्यात्मिक वारसा चालवण्याचे प्रामाणिक प्रयत्न करत असतात त्याच बरोबर गैळहसगाव येथील प्रामाणिकपणे शेती व्यवसाय करून उपजीविका भागवणारे गोवर्धन(मिठु) महाराज कोरडे हे अंजनवती सह पंचक्रोशीतील सर्व आध्यात्मिक कार्याला उपस्थिती लावतात त्याचबरोबर सखाराम मोरे हे सर्व दिंडी सोहळे व हरिनाम सप्ताहाला मोफत ट्रक हे वाहन उपलब्ध करून देतात त्यामुळे या अध्यात्मिक सप्तपदींचा मी विशेष गौरव करतो असे यावेळी बाळासाहेब मोरे म्हणाले त्याचबरोबर गेली तीन वर्षांपूर्वी अंजनवती येथील श्री संत तुकाविप्र महाराज व आई सत्वाईदेवी या दोन्ही धार्मिक स्थळांचा प्रस्ताव पर्यटन विभागाकडे तत्कालीन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष रमेश पोकळे यांच्या माध्यमातून दाखल केले ना.गिरीश महाजन यांचे स्वीय सहाय्यक, अप्पर सचिव मंत्रालय मुंबई व अंजनवती येथील मठाधिपती विवेक महाराज विप्र यांचे मेहुणे निशिगंधजी देशपांडे साहेबांच्या माध्यमातून व शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांच्या सहकार्यातून सुमारे दीड कोटी निधी मंजूर झाला आहे तसेच अंजनवती येथील मठामध्ये सप्ताह सुरू असताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी नुकतीच भेट देऊन गावकर्यांना मठासाठी निधी मंजूर करून आणतो असा शब्द दिला होता अवघ्या एक-दीड महिन्यातच त्यांनी ६० लक्ष रुपये निधी मंजुर झाल्याचे पत्र सरपंचाकडे सुपूर्द केल्यामुळे अंजनवतीकरांनी त्यांना धन्यवाद दिले आहेत अंजनवतीच्या धर्तीवर बोरबन या ठिकाणाचा देखील कायापालट झाला पाहिजे यासाठीही सर्वांनी प्रयत्न करायेत अशी विनंती यावेळी बाळासाहेब मोरे यांनी केली.

भरत काटवटे, विष्णूबप्पा येडे, श्रीमंतकाका येडे, पपन विप्र, परमेश्वर माळवाले, भगवानभाऊ येडे, आश्रुबा काटवटे, श्रीरंगबापू येडे, खवणे दादा, पांडुरंग आनंदराव येडे, शेषमोहन येडे, तांदळे फौजी, आश्रुबा बाबुराव येडे, जालिंदर माळवाले, पांडुरंग काटवटे, सुंदर पांचाळ,बंडु काटवटे, रामदास(नाना) मोरे, तुकाराम पांडुरंग येडे, अण्णासाहेब येडे, महादेव काटवटे, केशव येडे, तुकाराम मोरे,काळे चेअरमन घारगावकर, हरीओम शेळके,रंगेश बहीर, गोवर्धन जाधव सर, अर्जुन माळवाले, दत्ता त्रींबक येडे, रामेश्वर काटवटे,सुदाम गोविंदराव येडे, हनुमान आमटे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, माता-भगिनी व भाविक भक्तांची मोठी उपस्थिती होती.

पंकजा मुंडे यांना देशात ....

२७ कोटी ८० लाख.तर

वसंतराव नाईक तांडा सुधार योजनेअंतर्गत दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे बंद पडलेल्या उपसा जलसिंचन योजना पुन्हा सुरु करण्यात आले असून त्यासाठी अडीअडीचे कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असल्याचेही ते म्हणाले.उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांच्या निवासस्थानासाठी ३० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.यासह अनेक विकास कामांची माहिती त्यांनी यावेळी पत्रकारांना दिली.दरम्यान येत्या लोकसभेच्या अनुषंगाने विचारलेल्या प्रश्नावर त्यांनी सांगितले की,महायुतीकडून पंकजा मुंडे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.त्यांना देशात सर्वाधिक मतांनी विजयी करण्याचा आमचा प्रयत्न राहील.अशी ग्वाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.यावेळी शिवसेनेचे तालुका अध्यक्ष तुकाराम येवले,सभापती जयदत्त नरवडे, माजी समाज कल्याण सभापती कल्याण आबूज,अच्युत लाटे, उपस्थित होते.

होळकर शाहीचे संस्थापक सुभेदार ....

ढवळे यांनी केले. राजेभाऊ आप्पा गिरे, बाळकृष्ण थोरात, संदिप मुळे, शहादेव धलपे, हनुमंत वैद्य,सुधीर वाणी, विक्रांत वाणी, अभिजित गायकवाड, सुरेश निर्मळ,दादा गायकवाड, रोहिदास जाधव,सुशील लगास, शिवम कोकाटे, विशाल तागड अक्षय नाईकवाडे, महावीर मुळे,विशाल लगास, गणेश तागड, विश्वंभर मुळे उपस्थित होते...

सेवानिवृत्त पत्रकारांचे मानधन ....

संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांनी वेळोवेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, देवेंद्र फडणवीस, माहिती व जनसंपर्क महासंचालक ब्रिजेश सिंह यांच्या भेटी घेऊन त्यांना राज्यातील पत्रकारांच्या समस्यांबाबत सांगितले होते. बारामती येथे सुमारे दोन हजार पत्रकारांच्या उपस्थितीत अधिवेशन घेण्यात आले. यावेळी देखील मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनातील मुद्द्यांवर आधारित आपल्या मागण्या शासनाकडे पाठवा, त्यावर गांभीर्याने विचार केला जाईल, असे आश्वासन दिले होते. ज्येष्ठ पत्रकारांना सामाजिक सुरक्षा, सुविधा देण्याच्या दृष्टीने आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजना अंतर्गत शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सव पत्रकार कल्याण निधीमधील ठेवीवरील व्याजाच्या रकमेतून दरमहा ११ हजार रुपये एवढे अर्थसाहाय्य पात्र ज्येष्ठ पत्रकारांना देण्यात येत होते. यावर विधान परिषदेत व्हॉईस ऑफ मीडियाचा आवाज आमदार धीरज लिंगाडे यांनी बुलंद केला होता. शासनाचे लक्ष वेधले होते. दहा मार्च रोजी घेतलेल्या शासन निर्णयानुसार अधिस्वीकृती धारक पात्र ज्येष्ठ पत्रकारांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेअंतर्गत दिले जाणारे अकरा हजार रुपयांचे अर्थसाहाय्य वीस हजारांपर्यंत वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या समितीने शिफारस करून हा सकारात्मक निर्णय पुढे आला आहे. हा व्हॉईस ऑफ मीडियाने दिलेल्या लढ्याचे यश आहे. शासनाने घेतलेल्या या निर्णयाबद्दल व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांनी दूरध्वनीवरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

राजकीय पक्षांनी आदर्श ....

कोणीही उच्चपदस्थ असली तरी तिला अटीतून सूट मिळणार नाही, अशी माहिती जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यातील काही शासकीय इमारतीचे बांधकाम होत असल्यामुळे लगतच्या चंपावती शाळेत निवडणुकीशी निगडित कार्यक्रम होतील याची माहिती पण जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिली.बीड जिल्ह्यात चौथ्या टप्प्यात १३ मे ला निवडणूक होणार असून हा काळ विद्यार्थ्यांसाठी सुट्ट्यांचा असतो त्यामुळे निवडणूक प्रक्रियेत अधिकाधिक लोकांनी आणि विशेषतः तरुणांनी भाग घ्यावा असेही आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले.

यावेळी भारतीय निवडणूक आयोगाने दिलेल्या सोयी सुविधेबाबतचीही माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली या अंतर्गत दिव्यांगांसाठी तसेच ८० वर्षापेक्षा अधिक वयोगटातील व्यक्तींसाठी घरपोच मतदानाची सुविधा उपलब्ध असेल. मतदान केंद्रावर व्हीलचेअरसह मूलभूत सुविधा असतील याबाबतही सांगितले. यावेळी दिव्यांग बूथ तसेच महिलांचे बूथ तयार केले जातील. मात्र अधिकाधिक मतदारांनी मतदान केंद्रावर येऊन मतदान करावे आणि इतरांनाही प्रोत्साहन करावे यासाठी राजकीय पक्षांनी त्याप्रमाणे प्रचार प्रसार करावा अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी यावेळी केल्या. काही मतदारांचे दोन ठिकाणी नावे असतात, अशा मतदारांनी कुठल्याही एका ठिकाणी नाव नोंदवावे यासाठी राजकीय पक्षांनीही याबाबत मतदारांना जागृत करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी यावेळी केले.जिल्हा पोलीस अधीक्षक श्री ठाकूर यांनी मतदारसंघात स्टार प्रचारकांच्या प्रचार सभा, प्रचार आदीवेळी कायदा व सुव्यवस्था भंग होऊ नये यासाठी काळजी घ्यावी, असे सांगितले. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री सोळंके यांनी निवडणूक काळात भरारी पथके, निगराणी पथके कार्यरत असून आचार संहिता भंगाच्या तक्रारीचा तातडीने दखल घेण्यात येईल असे सांगितले.याप्रसंगी निवडणुकीची तयारी, निवडणूक कार्यक्रमाचा दिनांक देऊन प्रचार व प्रसिध्दीसाठी सार्वजनिक मालमत्तेच्या विदुपीकरणापासून संरक्षण आदीसाठी नियम यांची माहिती दिली. तसेच आदर्श आचार संहिता मार्गदर्शक तत्वांच्या माहिती देण्यात आल्या. बैठकीसाठी आम आदमी पक्ष, शिवसेना शिंदे गट तसेच शिवसेना उद्धव ठाकरे गट, एम आय एम, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, काँग्रेस, बहुजन समाजवादी पक्ष, कम्युनिष्ट पक्ष. राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गट, आदी पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी राजकीय पक्षांना निवडणुकीशी संबंधित माहिती पुस्तिका देण्यात आली.

नारायणगडासाठी आलेल्या ....

पालकमंत्री धनंजय मुंडे ,गिरीश महाजन, यांच्या माध्यमातून या आराखड्यात सुधारित मान्यता देण्यात आली यासाठी आमदार लक्ष्मण पवार तसेच माजी आमदार अमरसिंह पंडित साहेब यांचे मोलाचे सहकार्य लाभले

मंदिर परिसरात दगडी फरशी बांधकाम, प्रवेशद्वारावर सुंदर असे वास्तुशिल्प चारही दिशांना, लँडस्केप, सार्वजनीक शौचालय, पाणी व जलव्यवस्थापनात पाण्याची टाकी, पाईपलाईन व उपांग दुरूस्तीची कामे, जलसंवर्धन कामे, वाहनतळ, सिमेंट कॉंक्रिट वाहनतळ, बस स्टँड, दोन प्रसादालय, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन. इत्यादी महत्त्वाची कामे होणार असून या कामी मनोज जरांगे पाटील यांनीही गडाच्या निधीसाठी थेट मुख्यमंत्र्यांशी संपर्क साधून पाठपुरावा केला होता.मागील काही महिन्यांपासून मी व विश्वस्त नारायणगडच्या कामांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब दोन्ही उपमुख्यमंत्री पालकमंत्री धनंजय मुंडे, पंकजाताई मुंडे व गिरीश महाजन यांच्याकडे पाठपुरावा केला. यासाठी आमदार लक्ष्मण पवार तसेच माजी आमदार अमरसिंह पंडित साहेब यांचे सहकार्य लाभले. यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात नारायणगडासाठी निधी उपलब्ध झाला त्याबद्दल सर्वांचे आभार . तसेच श्री क्षेत्र नारायण गडाला आलेल्या निधीमध्ये कोणत्याही क्षीरसागरां चे योगदान नही विनाकारण कोणीही श्रेय घेण्याचा प्रयत्न करू नये.धाकटी पंढरी नगद नारायण गडाच्या विकास कामासाठी निधी उपलब्धतेचा अद्यादेश शनिवारी दुपारी गडाचे महंत शिवाजी महाराज यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमूख विश्वस्त अनिल जगताप,शिवसेना जिल्हाप्रमूख सचिन मळूक, बळीराम गवते, गोवर्धन काशिद, यांच्यासह

पाणी टंचाईसह विविध विषयांवर शिवसेना पदाधिकाऱ्यांची अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा

गेवराई (प्रतिनिधी)- बीड व गेवराई तालुक्यात पाणी टंचाईसह विविध विषयांवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे गेवराई तालुका प्रमुख अजय दाभाडे यांनी जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या उपस्थितीत अतिरिक्त जिल्हाधिकारी यांची भेट घेत त्यांना जनतेच्या जिव्हाळ्याचे समस्या सांगून यावर तात्काळ उपाय योजना करण्याची विनंती केली नसता तीव्र आंदोलनांचा इशारा दिला आहे.

दरवर्षीच्या तुलनेत गेल्या वर्षी पर्जन्यमान अत्यंत कमी झाले असल्याने यावर्षी बीड जिल्ह्यात आणि विशेषतः बीड व गेवराई तालुक्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक गावात आजच ग्रामस्थांना प्यायला पाणी नाही. या पुढच्या काळात हे पाण्याचे संकट आणखी भीषण होईल अशी स्थिती आहे. त्यासोबतच जनावरांच्या चाऱ्याचा आणि त्यांच्याही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होत जाईल अशी स्थिती आहे. त्यामुळे अशा संकट काळात सर्वसामान्यांना आधार देण्याची गरज आहे. परंतु प्रशासन लाचखोरीत व्यस्त असल्याने त्यांना सामान्यांचे प्रश्नच कळायला मार्ग नाही. त्यामुळे वेळीच प्रशासनाने दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन सदर परिस्थिती हाताळण्यासाठी उपाययोजना कराव्यात. त्यासोबतच मागणी येईल तिथे पाण्याचे टँकर सुरू करावेत. पशुधन वाचवण्यासाठी जनावरांच्या छावण्या सुरू कराव्यात. शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळालेली नाही ती १००% मंजूर करून वाटप करावी. सन २०२३ चा २५% अग्रीम पिक विमा १००% शेतकऱ्यांना मिळालेला नाही, तो तात्काळ द्यावा. शेतकऱ्यांना सन २०२२ चे अतिवृष्टी अनुदान मिळालेले नाही ते तात्काळ द्यावे. पीक कर्जाचा व्याज परतावा शेतकऱ्यांना मिळत नाही तो विना विलंब द्यावा. उत्पादन झालेल्या सोयाबीन, कापूस यांना योग्य भाव द्यावा. सासनाच्या आदेशाविरोधात जात बँकांकडून कर्ज वसुली सुरू आहे, शेतकऱ्यांच्या कर्ज थकबाकीमुळे खात्यालाल लागलेले होल्ड तात्काळ काढावेत. यासह विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. या मागण्यांची दखल घेऊन यावर तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे तालुका प्रमुख अजय दाभाडे यांनी जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या उपस्थित अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.मागणी मान्य न केल्यास लोकशाही मार्गाने शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने व संपर्क नेते सुनिल प्रभू , किशोर पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन केले जाईल असा इशाराही प्रशासनाला अजय दाभाडे यांनी दिला आहे.यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बीड तालुक प्रमुख गोरख सिंघन,बाळासाहेब बजगूडे ,प्रशांत बजगुडे ,अफसर शेख,शुभम मोंढे,हनुमान पवार,यांच्या सह पदाधिकारी ही उपस्थित होते.

२५ कोटींची योजना जनतेच्या निकामी, पाणी देता का कोणी पाणी ?

नेकनूर मध्ये तीन महिन्यापासून पाण्याच्या ठणठणात!

नेकनूर (प्रतिनिधी) - बीड तालुक्यातील नेकनूर गाव सध्या पाणी टंचाईच्या झळा सोसत आहे. नेकनूर गावातील प्रशासनाच्या निष्क्रिय कारभारामुळे तब्बल गावाला तीन महिन्यापासून पाण्याचा ठणठणाट निर्माण झाला आहे. साडेपाच कोटीची भंडारवाडी धरण पाणीपुरवठा योजना व नंतर १९ कोटीची पाणीपुरवठा योजना मंजूर होऊनही कोणी पाणी देतं का पाणी करत पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ नेकनूरकरांवर आली आहे. गावात सद्या पाणी विक्रीचा व्यवसाय तेजीत असून दरोज सामान्य नागरिकांचे लाखो रुपये पाण्यासाठी जात आहेत. एक हजार लिटर पाण्यासाठी दोनशे रुपये मोजण्याची वेळ नेकनूरकरांवर आली आहे.

दुष्काळ परिस्थितीत कामधंदे नसताना सामान्य नागरिकांचे आर्थिक बजेट कोलमडले असताना नागरिकांचा पाण्यावर मोठा खर्च होताना दिसत आहे. नेकनूर गावासाठी असलेल्या भंडारवाडी धरण पाणीपुरवठा योजना व त्यानंतर मंजूर झालेल्या १९ कोटी रूपयांच्या जलयोजनेचे काम अद्याप पूर्णत्वास नाही. त्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. गावात उन्हाळा, हिवाळा, पावसाळा अशा तीनही ऋतूत कधी तांत्रिक कारणाने तर बहुतांश वेळेस नियोजनाअभावी पाण्यासाठी ग्रामस्थांचे हाल होत आहेत. जानेवारीपासून ते आज मार्चपर्यंत नळाला पाणी नसल्याकारणे आणि सर्व स्रोत कोरडेठाक असल्याने नागरिक पाण्यासाठी वणवण भटकत आहेत. मात्र, शासकीय यंत्रणा आणि स्थानिक यंत्रणाचा गलथान कारभारामुळे अद्याप हा प्रश्न सुटलेला नाही.

वेतनासह सर्व आस्थापना मधील झिरो पेंन्डनसीच्या मागणीला सकारात्मक सहकार्य करणार-फुलारी

बीड (प्रतिनिधी) - जिल्हा परिषद, बीड येथे नुकतेच प्राथमिक शिक्षणाधिकारी पदी रूजू झालेले मा.श्री भगवानराव फुलारी यांचा सत्कार प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीड च्या वतीने आयोजित करण्यात आला होता.त्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना श्री फुलारी साहेब यांनी प्रहार ही शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या साठी काम करत असताना, विद्यार्थी हितासाठी देखील प्रहार एन्युकेशन सेल मार्फत कार्य करत आहे. तसेच पाणपोई, शैक्षणिक साहित्य वाटप, पालावरील दिवाळी सारखे उपक्रम राबवून सामाजिक उत्तरदायित्व जपणारी एकमेव संघटना आहे, असे प्रतिपादन केले. आणि म्हणूनच प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना ही सदैव प्रशासनाला विश्वासात घेऊन कार्य करणारी असल्याने,या संघटनेच्या सर्व हितकारक अशा सर्व आस्थापना मधील झिरो पेंन्डनसी ची मागणी पूर्ण करण्यासाठी कर्मचारी वर्गाला तसे आदेश देण्यात येऊन, सदैव सहकार्य केले जाईल, असे आश्वासन शिक्षणाधिकारी फुलारी यांनी यावेळी दिले आहे.

बीड जिल्हाजील अग्रगण्य अशा व वाढी वस्ती तांड्यावर कार्य करणाऱ्या शिक्षक बांधवांची हक्काची संघटना म्हणून लौकिक प्राप्त प्रहार शिक्षक संघटनेकडून नुतन शिक्षणाधिकारी श्री फुलारी साहेब यांचा बीड जिल्हातील समस्त शिक्षक बांधवांच्या वतीने प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीड चे जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी व सर्व प्रहार पदाधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी प्रास्ताविक करताना जिल्हा सरचिटणीस अविनाश काळे यांनी प्रहारच्या कार्याची माहिती सादर केली.यावेळी बीड जिल्ह्यातील शिक्षकांचे वेतन वेळेवर व्हावे व आर्थिक विषयांशी संबंधित सर्व प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागावेत यासाठी सदैव मदत व तत्पर कर्तव्यदक्ष सहायक लेखाधिकारी सुरेश प्रधान साहेब आणि मागील दोन वर्षांपासून प्रलंबित अशा आस्थापनेत रूजू होऊन अवघ्या तीन ते चार महिन्यांत ३५० ते ४०० वरीष्ठ श्रेणी व ७५ते १०० निवड श्रेणी प्रस्ताव उचित कार्यवाही सह अत्यंत जलदगतीनि निकाली काढण्यासाठी धडपड करणारे , लक्ष्मीकांत देशपांडे यांचा बीड जिल्ह्यातील समस्त शिक्षकांच्या भावनेचे प्रतिनिधित्व व त्यांच्या उत्कृष्ट कार्याचा सन्मान व्हावा म्हणून शिक्षणाधिकारी साहेबांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

महिला रक्त तपासणी शिबिर संपन्न

सिरसाळा (प्रतिनिधी) - दिनांक १५ मार्च २०२४ रोजी जनहित बहुउद्देशीय सेवाभावी संस्था पिंपरी बुद्रुक श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय सिरसाळा गृहविज्ञान विभाग, महिला कक्ष व फिनिक्स ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने, आयोजित. महिला रक्त तपासणी शिबिर प्राथमिक आरोग्य केंद्र सिरसाळा येथे संपन्न झाले.

या शिबिरामध्ये ४७ महिलांची रक्त तपासणी करून घेण्यात आली. या तपासणीमध्ये -लिपिड प्रोफाइल, लिव्हर प्रोफाईल,किडनी प्रोफाइल, थायरॉईड प्रोफाइल, हिमोग्राम, डायबेटीक प्रोफाइल या चाचण्या करून घेण्यात आल्या.वासाठी सिरसाळ्याच्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रमुख डॉ मुंडे सर यांचे सहकार्य लाभले. व रक्ताचे नमुने घेण्यासाठी लॅब असिस्टंट नंदकिशोर सोळंके, शिवाजीराव राठोड व दोन सहकारी यांनी परिश्रम घेतले. यावेळी प्राचार्य डॉ. के के पाटील सर, नॅक समन्वयक जाधव सर, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख धन्वे सर, डॉ. बडे मॅडम,डॉ.ललवाणी सर, जनहित संस्थेचे अध्यक्ष उत्तमराव माने यांनी भेटी दिल्या. यावेळी फिनिक्स ग्रुपच्या डॉ. उषा पवार डॉ. स्वाती सोनवणे डॉ. सुषमा ललवाणी अनिता दहिवाळ प्रा.डॉ. अरुणा वाळके यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले व प्रा.डॉ उषा माने यांनी कार्यक्रमाचे नियोजन आयोजन यासाठी परिश्रम घेतले.

विशाल सातव कृषी सहाय्यक तर शुभांगी राऊत बनली तलाठीपदी

शेतकरी कुटुंबातील तरुणांचे यश

जामखेड (प्रतिनिधी)- शेतकरी कुटुंबात जन्मलेले, ग्रामीण भागात शिक्षण घेतलेले तरूण तरूणी जिद्दीच्या, कठोर परिश्रमाच्या बळावर स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होऊ शकतात.

जामखेड तालुक्यातील फक्राबाद येथील विशाल महादेव सातव या तरुणाची कृषि सहाय्यक म्हणून नाशिक विभागातून निवड करण्यात आली आहे. तर शुभांगी धनंजय राऊत हिची तलाठीपदी निवड झाली आहे. या तरुणांनी फक्राबाद गावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

शेतकरी कुटुंबातील विशाल सातव आणि शुभांगी राऊत यांनी मिळवलेल्या धवधवीत यशाबद्दल फक्राबाद ग्रामस्थ व अजय सातव मित्र मंडळ यांच्यावतीने त्यांचा नागरी सत्कार करत गौरव करण्यात आला. यावेळी आ प्रा.राम शिंदे यांचे स्वीय सहायक अजय सातव, मार्केट कमिटीचे संचालक नारायण जायभाय, युवा नेते मकरंद राऊत, मिठू राऊत, पांडुरंग शिंदे, सुखदेव सातव, महादेव सातव, राहुल राऊत सर, महादेव जायभाय,पोलीस पाटील योगेश जायभाय, ग्रामपंचायत सदस्य गहिनाथ जायभाय, परसराम राऊत, सोसायटीचे व्हॉइस चेअरमन संतोष राऊत, जिल्हा परिषद स्कूल कमिटीचे अध्यक्ष शरद उबाळे, पंढरीनाथ गणगे, युवा उद्योजक उत्तम शिंदे, युवा उद्योजक विजय सातव, शांतिलाल जायभाय मेजर, संजय राऊत सर, मिलिंद राऊत, कृष्णा उबाळे आदी उपस्थित होते. विशाल व शुभांगी यांचे सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे.

लिंबागणेश येथील संवेदनशील मतदान केंद्राचा एसपींकडून आढावा

बीड (प्रतिनिधी) - आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने या संवेदनशील मतदान केंद्राचा आढावा घेण्यासाठी शनिवारी (दि.१६) पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, सहाय्यक पोलीस अधिक्षक कमलेश मीना, उपविभागीय पोलिस अधिकारी गोल्डे,नेकनूर ठाण्याचे प्रभारी सपोनि चंद्रकांत गोसावी यांनी लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत फेव्हिस्टीकची घटना घडलेल्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करत ग्रामस्थांकडून माहिती घेतली. दरम्यान आगामी निवडणूकांत लोकशाहीला मारक घटना घडली तर राजद्रोहाचा गुन्हा दाखल करू असा इशारा यावेळी पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी दिला. तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत दि.१८ डिसेंबर २०२२ रोजी घेण्यात आलेल्या ग्रामपंचायत निवडणुक दरम्यान प्रभाग क्रमांक २ मधील सरपंच पदाचे दावेदार असणाऱ्या अँड.गणेश वाणी यांच्या शिट्टी चिन्ह असलेल्या बटणावर मशिनमध्ये फेव्हिस्टीक टाकल्याचा प्रकार घडून आला आला होता. संबंधित प्रकरणी केंद्र प्रमुखांच्या फिर्यादीवरून नेकनुर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यामुळे दि.२३ डिसेंबर रोजी फेरमतदान करण्यात आले होते. फेरमतदानात ४२ मते वाढली होती. यात बाळासाहेब जाधव विजयी झाले होते. लिंबागणेश जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचा निवडणुकीच्या अनुषंगाने आढावा घेतल्यानंतर एसपी ठाकूर यांनी गावातील प्रमुखांची ग्रामपंचायत कार्यालय येथे बैठक घेतली. ते म्हणाले, घडलेली घटना अतिशय दुर्दैवी आणि लोकशाहीला मारक आहे. निवडणूक आयोगाने याबाबतीत कठोर धोरण अवलंबिले असून लोकशाहीला मारक घटनांच्या बाबतीत राजद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात येईल अशी तंबी देत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित करणारांची गय केली जाणार नाही त्यासाठी ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन केले.यावेळी डॉ.गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब जाधव, ग्रामसेवक वीर, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात, समीर शेख, जीवन मुळे, सुखदेव वाणी, राजेभाऊ गिरे, अँड.गणेश वाणी, विक्रांत वाणी, संतोष वाणी, सुरेश निर्मळ,दादा गायकवाड, रामचंद्र मुळे, पत्रकार हरिओम क्षीरसागर आदि ग्रामस्थ उपस्थित होते.

पीक विमा अग्रीमचा ७४ कोटींचा दुसरा टप्पा वाटप

भाई थावरेंच्या आंदोलनाला यश

बीड (प्रतिनिधी)- गतवर्षीच्या खरीप हंगामात जिल्ह्यातील शेतकर्यांच्या पिकांचे नुकसान झाले होते. या पीक विम्याच्या अग्रीमची रक्कम पहिल्या टप्प्यात वाटप झाली होती. मात्र दुसर्या टप्पा तांत्रिक बाबींमुळे वाटप केला जात नव्हता. यासाठी शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामदिनी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांची बीडमध्ये गाडी आडवून आंदोलन केले होते. यामुळे जिल्ह्यातील शेतकर्यांना पीक विमा अग्रीमचा ७४ कोटींचा दुसरा टप्पा वाटप वाटप झाला आहे. शेतकरी संघर्ष समितीने केलेल्या आंदोलनामुळे हे यश आले असल्याचे भाई थावरे यांनी म्हटले आहे.थावरे म्हणाले की, गतवर्षी जिल्ह्यात पावसाने दडी मारल्याने शेतकर्यांचे मोठे नुकसान झाले होते. शासनाने पिकांचे पंचनामे करुन विमा कंपनीला २५ टक्के अग्रीम पिक विमा देण्याची सूचना केली होती. यानंतर अग्रीम रक्कम देण्यास विलंब लागत असल्याने शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामदिनी बीडमध्ये शासकीय ध्वजारोहणानंतर कृषीमंत्री धनंजय मुंडे यांची गाडी अडवून आंदोलन केले होते. या आंदोलनाची दखल घेऊन शासनाने अग्रीमचा दुसर्या टप्पात ७४ कोटी रुपये जिल्ह्यातील शेतकर्यांना वाटप केले असल्याचे थावरे म्हणाले.

निवडणूक कालावधीत जात, धर्म आणि भाषावार कार्यक्रमांच्या आयोजनावर निर्बंध

बीड (प्रतिनिधी) -भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी कार्यक्रम शनिवारी जाहीर केला आहे. आजपासून आदर्श आचार संहिता लागू झालेली आहे. बीड जिल्ह्यातील लोकसभा निवडणूकीची संपुर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन जिल्ह्यात कसल्याही प्रकारचे जात, भाषा, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजनावर निर्बंध घालण्यात आली असल्याची माहिती पत्रकारद्वारे जिल्हाधिकारी दीपा मुदोळ मुंडे यांनी कळविली आहे.

जिल्हादंडाधिकारी बीड फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन असे आदेश जारी करण्यात आलेले आहे, जिल्ह्यात कुठेही कसल्याही प्रकारचे जात, भाषा, धार्मिक आयोजनावर निवडणूक प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत (दिनांक ६ जून २०२४ पर्यंत) निर्बंध राहतील. प्रत्येक ईसमावर हे आदेश तामील करणे शक्य नसल्यामुळे हे एकतर्फी आदेश ध्वनीक्षेपकावर पोलीस विभागाने जाहीर करुन त्यास प्रसिध्दी करावी असेही आदेशीत केले असून हे आदेश आज शनिवार दिनांक १६ मार्च २०२४ रोजीपासून लागू होतील.

प्रवाशी महिलेचे गंठण चोरणारी महिला पकडली

बीड (प्रतिनिधी) -येथील बसस्थानकात गर्दीचा फायदा घेत प्रवाशी महिलांच्या गळ्यातील किंमती गंठण चोरुन नेणाऱ्या महिलेस स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसांनी अटक केली आहे. तिच्याकडून दोन तोळयाचे चोरी गेलेले गंठण पोलीसांनी हस्तगत केले.

गवळण पांडुरंग गायकवाड (रा.माऊलीनगर, पेठ बीड) असे आरोपी महिलेचे नाव आहे. ५ मार्च रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास बीड बसस्थानकातून पुण्याला जाण्यासाठी सुलभा मनोज गाडे (रा.वाघोली जि.पुणे) या बसमध्ये बसत होत्या. याच दरम्यान एका महिलेने त्यांच्या गळ्यातील दोन तोळयाचे गंठण चोरुन नेले होते. त्याबरुन शिवाजीनगर ठाण्यात गुन्हाची नोंद झाली होती.हा गुन्हा उघडकीस आणण्याचे अनुषंगाने पोलीस निरीक्षक संतोष साबळे यांनी अशा प्रकारचे चोरी करणारे चोरट्यांची माहिती काढली. दरम्यान १३ मार्च रोजी त्यांना माहिती मिळाली की, हा गुन्हा गवळण पांडुरंग गायकवाड हिने केला असून ती सध्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकजवळील पुलावर उभी आहे. या माहितीवरुन त्यांनी महिला अंमलदारसह पथक रवाना केले. तेथे त्या महिलेस ताब्यात घेत विचारपूस केली असता तिने गुन्हयाची कबुली दिली तिच्याकडून दोन तोळयाचे सोन्याचे गंठण जप्त करण्यात आले. महिलेस पुढील कार्यवाहीसाठी शिवाजीनगर ठाण्यात हजर करण्यात आले. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि. श्रीराम खटावकर,पोह. मनोज वाघ,प्रसाद कदम, पोना. विकास वाघमारे, सोमनाथ गायकवाड, नारायण कोरडे, मपोह.सुशिला हजारे, स्वाती मुंडे, पोशि.सचिन आंधळे व चालक सुनिल राठोड यांनी ही कारवाई केली.

परळी महसूल विभागास मिळाले ६ नवीन तलाठी

परळी (प्रतिनिधी)-परळी तालुक्यात नव्याने सहा तलाठी रूजू होनार असून या नवीन तलाठी रूजू बाबत जिल्हाधिकारी कार्यालय बीड आस्थापना विभाग यांच्याकडून १५ जुलै रोजी आदेश काढण्यात आलेले आहेत.शासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेनुसार बीड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडुन जाहिरात क्रमांक तलाठी भरती / प्र. क ४५ / २०२३ दि.२६.०६.२०२३ ऑनलाईन पद्धतीने प्रवर्ग निहाय रिक्त पदे भरणेसाठी अर्ज मागविण्यात आलेले होते. याकरिता राज्य शासनाकडून तलाठी पदासाठी दि. १७ ऑगस्ट २०२३ ते १४ सप्टेंबर २०२३ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेण्यात आली. प्रचलीत शासन निर्णय / परिपत्रकातील तरतूदीनुसार जिल्हा निवड समिती बीड यांनी अंतिम निवड यादी करण्यात आली अस्सून संबंधित उमेदवारांनी पदस्थापनेच्या ठिकाणी विहीत मुदतीत रूजू होणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.या नवीन तलाठी भरती मध्ये परळी तालुका महसूल विभागास ६ नवीन तलाठी मिळणार अस्सून यामध्ये पिंप्री बु, बेलंबा, करेवाडी, धर्मापुरी, वाघाळा व जयगाव या ठिकाणी नवीन तलाठी रूजू होण्याचे आदेशीत करण्यात आले आहे.

अल्पसंख्याक भागात विकासकामांसाठी ३ कोटींचा निधी मंजूर

बीड मतदारसंघातील ५५ अंगणवाड्या होणार स्मार्ट

डॉ.योगेश क्षीरसागर यांचा पाठपुरावा

बीड (प्रतिनिधी) - बीड मतदारसंघातील विविध भागात अल्पसंख्याक समाजाच्या विकासकामांसाठी ३ कोटी रुपयांचा निधी शुक्रवारी (दि.१५) मंजूर झाला आहे. या निधीतून शहर व ग्रामीण भागातील रस्ते, नाली, शहरातील जैन मंदिर परिसरातील विकासकामे, ख्रिश्चन समाजाचे सभागृह होणार आहे. बीड मतदारसंघातील ५५ अंगणवाड्या स्मार्ट होणार आहेत. या विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पाठपुरावा केला आहे.राज्य शासनाच्या अल्पसंख्याक बहुल क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत बीड मतदारसंघातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात कोट्यवधी रुपयांची विकासकामे सुरू आहेत. त्यासाठी वापूर्वीच भरीव निधी मिळालेला आहे. आता आणखी ३ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून बीड शहरातील जालना रोड भागातील जैन मंदिर परिसरात संरक्षण भिंत, रस्ता होणार आहे. तसेच, धानोरा रोड परिसरात ख्रिश्चन समाजाचे भव्य असे सभागृह बांधकाम होणार आहे. तसेच ग्रामीण भागातील रस्ते, नालीसह इतर विकासकामे मार्गी लागतील. हा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व कृषिमंत्री धनंजय मुंडे यांचे आभार मानले आहेत. बीड जिल्हातून २०० अंगणवाड्या स्मार्ट करण्यासंदर्भात महिला बालविकास विभागाकडे प्रस्ताव दाखल करण्यात आलेले होते. त्यापैकी बीड मतदारसंघातील ५५ अंगणवाड्यांना मान्यता मिळाली असून त्या स्मार्ट होणार आहेत. या कामासाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, महिला बालकल्याण मंत्री आदितीताई तटकरे, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. आता बीड शहर आणि ग्रामीण भागातील ५५ अंगणवाड्या स्मार्ट होणार आहेत, अशी माहिती डॉ. योगेश क्षीरसागर यांनी दिली.

अजितदादा,धनुभाऊंमुळे विकासाला गती मिळाली-डॉ.योगेश क्षीरसागर

महायुती सरकारच्या काळात बीड मतदारसंघातील अनेक मार्गी लागले. खऱ्या अर्थाने विकासाला उपमुख्यमंत्री अजितदादा, पालकमंत्री धनुभाऊ यांच्यामुळे गती मिळाली आहे. आपल्या माणण्यांचा सातत्याने सकारात्मक विचार करून भरीव निधी उपलब्ध करून दिला. ग्रामीण आणि शहरी विकासाला चालना मिळाली, त्याबद्दल महायुती सरकारचे आभार, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली.

मी नगदनारायण महाराजांचा निस्सीम भक्त ;सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येण्याचे व्यासपीठ म्हणजे सप्ताह-जरांगे पाटील

गेवराईत संत नगदनारायण महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त किर्तन सोहळ्यास प्रारंभ

गेवराई (प्रतिनिधी) - मी संत नगदनारायण महाराजांचा निस्सीम भक्त आहे. तसेच वारकरी संप्रदायाने आपल्या संस्कृतीचे जतन केले असून जीवनात कसे वागायचे हे आपण वारकरी संप्रदायाकडून शिकलो आहे. तर सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येण्याचे एक व्यासपीठ म्हणजे अखंड हरिनाम सप्ताह आहे. वारकरी संप्रदाय तसेच देव देवतांना मी मानतो असे प्रतिपादन मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले.

गेवराई शहरात स्वानंद सुखनिवासी संत कुलभूषण महात्मा वै.ह.भ.प. नगदनारायण महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त गजानन महाराज मंदिरात १३ व्या भव्य किर्तन सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास शनिवार दि.१६ मार्च रोजी श्रीक्षेत्र नगद नारायणगडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज, मराठा संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या शुभहस्ते ब्रम्हवृदांच्या जयघोषात विधिवत पुजा करुन संत-महंत तसेच भाविकांच्या उपस्थितीत फुले टाकुन भव्य सप्ताहाला सुरुवात झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महादेव महाराज पुरी, दिलीप महाराज घोगे,विष्णू देवानंद भारती, पंडित महाराज क्षीरसागर, बाळनाथ महाराज येवले, उत्तम नाना मोटे, शिनुभाऊ बेदरे. जेष्ठ पत्रकार शिवाजीमामा ढाकणे यांच्या सह सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, पत्रकार तसेच वारकरी संप्रदायातील जेष्ठ मान्यवर मंडळी, कीर्तन सोहळा समितीचे सर्व पदाधिकारी तसेच महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयुरध्वज औटे यांनी केले. या किर्तन महोत्सवात महाराष्ट्रातील ख्यातनाम महाराज मंडळीच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.तरी भाविकांनी भव्य कीर्तन सोहळ्यास सात दिवस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कीर्तन सोहळा समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

वाळू माफियांचे धाबे दणाणले

पोहनेरच्या गोदाकाठावर शेकडो ब्रास अवैध वाळूसाठा जप्त

सिरसाळा (प्रतिनिधी) - बेसुमार अवैध वाळू उपसा करुन तस्करी करणाऱ्या वाळू माफियावंर सिरसाळा पोलीस प्रशासन व परळी महसुल प्रशासनाने चांगलाच कार्यवाहीचा बडगा उगारला आहे. पोहनेर च्या गोदाकाठावर सयुंक्त कार्यवाही करत सुमारे १०० ब्रास अवैध वाळूसाठा जप्त केला आहे. ह्या कार्यवाही मुळे बेलगाम झालेल्या वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत.

सदरील कार्यवाही १५ मार्च रोजी सायं काळी ६ ते रात्री उशिरापर्यंत चालू होती.पोहनेर येथील गोदावरी नदी पात्रातून अवैध वाळू उपसा करुन त्याची साठवणुक करत रात्रीच्या अंधारात तस्करी केली जात असल्याची माहिती प्रशासनास मिळाली, माहितीनुसार सिरसाळा पोलीस स्टेशन चे सह पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे आपल्या टिम सह व महसुल प्रशासनाचे मंडळ अधिकारी सुरेवाड,तलाठी कांबळे, साबळे समावेत सदरील ठिकाणी पोहचले, प्रशासन कार्यवाहीची चाहूल लागताच वाळू माफिया आपल्या यंत्रणेसह पसार झाले.गोदावरी काठावर नदीपात्रातील १०० ब्रास वाळूसाठा निदर्शनास आला, ह्या वाळूसाठ्यावर कार्यवाही करत वाळू जप्त करण्यात आली . लोकसभा निवडणुकिच्या आचारसंहिते पुर्वी वाळू सारख्या अवैध धंद्यावर कार्यवाही झाली हि बाब खुप महत्वाची आहे. ह्या कार्यवाहीने माफिया मध्ये प्रशासनाची जरप बसली आहे

केज,अंबाजोगाईत दुचाकीच्या डिक्कीतून लांबवल्या रकमा

केज (प्रतिनिधी)-शहरातील एसबीआय धून विड्रॉल केलेली १ लाख २७ हजार रूपयांची रक्कम पाळत ठेवलेल्या चोरट्यांनी दुचाकीच्या डिग्गीतून चोरून नेली. ही घटना केज शहरातील कानडी रोड येथे १५ मार्च रोजी दुपारी पावणे दोनच्या सुमारास घडली. या प्रकरणी केज पोलिस ठाण्यात अज्ञातविरूध्द गुन्हा दाखल झाला.गोविंद मधुकर सोनवणे (रा.सारणी,ता.केज जि.बीड) यांनी या बाबत केज ठाण्यात फिर्याद नोंदवली. त्यांनी कळंब रोडवरील एसबीआयच्या शाखेतून त्यांच्या खात्यातील नगदी १ लाख २७ हजार रूपये काढून घेतले होते , नंतर ती रक्कम आणि पासबुक दुचाकीच्या डिग्गीत ठेवले. पाळत ठेवलेल्या चोरट्यांनी डिग्गीचे लॉक तोडून पासबुक,चेक,बुक व रक्कम चोरून नेली. उपनिरीक्षक पाटील या प्रकरणाचा तपास करीत आहेत.दरम्यान ही घटना ताजी असतांना याच दिवशी अडीच वाजण्याच्या सुमारास अंबाजोगाई शहरातील प्रशांत नगर येथे एका शेतकऱ्यांच्या दुचाकीच्या डिग्गीतून ५० हजारची रक्कम चोरून नेली. सुभाष रामभाऊ नरवडे (रा.मंगळवार पेठ,अंबाजोगाई) यांच्या बाबतीत हा प्रकार घडली. त्यांनी अंबाजोगाई पिपल्स बँकेतून ५० हजाराची रक्कम काढून दुचाकीच्या (क्र.एम.एस. ४४,एल. ५३०२) डिग्गीत ठेवले होते. ते टबुजाचे पैसे देण्यासाठी बाजूच्या गाड्याकडे गेले असता चोरट्यांनी ती रक्कम लांबवली या प्रकरणी अंबाजोगाई शहर ठाण्यात अज्ञातविरूध्द गुन्हा दाखल झाला.

आनंदगाव ते पी.डी.एस.विद्यालय सारणी रस्त्याची दुरावस्था

केज (प्रतिनिधी) - आनंदगाव ते सारनी येथील पी डी एस माध्यमिक विद्यालया पर्यंतचा रहदारीचा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे चक्क रस्त्यावर गुडघाभर खड्डे पडलेले आहेत नागरिकांना वे-जा करण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे तात्काळ रस्ता दुरुस्त करावा अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

आनंदगाव ते केज हा बाजारपेठ साठी अत्यावश्यक रस्ता. व्यापारी ,विद्यार्थी शेतकरी ,कर्मचारी या रस्त्याने मोठ्या प्रमाणात वे-जा करतात हा रस्ता उखडलेला आहे. गुडघाभर खड्डे पडल्याने दुचाकी चालवणे ही कठीण झाले आहे. खड्डे पडल्यामुळे वाहनांना अपघाताचे प्रमाणही वाढले आहे तात्काळ हा रस्ता डांबरीकरण करण्यात यावा अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.आनंदगाव ते सारणी शाळा हा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे. तो दुरुस्त करण्यात यावा यासाठी अनेक वेळा मागणी करून रस्ता केला जात नाही हा रस्ता तात्काळ डांबरीकरन न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा गावकऱ्यांच्या वतीने देण्यात आला आहे केवळ दीड किलोमीटर अंतर जाण्यासाठी तब्बल अर्धा तासाचा वेळ लागत असेल तर त्यापेक्षा पांदण रस्ता चांगला म्हणावा लागेल या रस्त्याने वागणे अवघड झाले.विद्यार्थ्यांना ठेचा लागतात दीड किलोमीटर अंतर रस्त्यावर खड्डे पडून वर खडीचे ढगड पडलेले आहेत त्यामुळे शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना पायी चालतानाा सुद्धा ठेचा लागून जखमा होत आहेत पावसाळ्यापूर्वी हा रस्ता तात्काळ करण्यात यावा पावसाळा सुरू होतांच हा पांदण रस्ता होईल असे दिसते. रस्त्याचे काम तात्काळ करण्यात यावे अशी मागणी केली जात आहे.

मुख्याध्यापकास मारहाण करणे भोवले

दोन शिक्षक तडकाफडकी निलंबित

बीड (प्रतिनिधी) - गेवराई तालुक्यातील शेकटा येथील जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकास दोन शिक्षकांनी कट रचून अंगावर गाडी घालत भर रस्त्यावर जबर मारहाण केली. ही घटना १२ मार्च रोजी पाडळशिंगी हायवेवर दुपारी चार वाजता घडली होती. या घटनेत जखमी झालेल्या मुख्याध्यापकास जिल्हा रुग्णालयातील वार्ड क्रमांक पाचमध्ये उपचार घेण्यासाठी दाखल करण्यात आले. याबाबत गेवराई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या दोन शिक्षकांना प्रभारी सीईओ संगीतादेवी पाटील यांनी तडकाफडकी निलंबित केले.

अंबादास मल्हारी नारायणकर असे मारहाण झालेल्या शिक्षकाचे नाव आहे. नारायणकर गेवराई तालुक्यातील शेकटा येथील जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्यासह या शाळेत आठ शिक्षक कार्यरत आहेत. मुख्याध्यापक अंबादास नारायणकर यांना १२ मार्च रोजी गाडीमधून प्रवास करताना सहशिक्षक रघुनाथ नागरगोजे आणि सुभाष गिरी या दोघांनी कट रचून पाडळशिंगी परिसरात अंगावर गाडी घालून भर रस्त्यावर बेदम मारहाण केली. यावेळी सहशिक्षक राजेंद्र घोडके आणि लक्ष्मण परझने यांनी गिरीला रोखले त्यामुळे मुख्याध्यापक अंबादास नारायणकर यांचा जीव वाचला. शिक्षकांच्या या वर्तनाने बीड जिल्हा परिषदेची इभ्रत वेशीला टांगली गेली होती.याप्रकरणी गेवराई पोलिस ठाण्यात सदर मुख्याध्यापकाने दिलेल्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आता मुख्याध्यापकास मारहाण करणाऱ्या त्या दोन्ही शिक्षकांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे.

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबिराचा मंझरी येथे समारोप

बीड (प्रतिनिधी) - तालुक्यातील मंझेरी येथे आदर्श शिक्षण संस्थेच्या सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने व आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकच्या सौजन्याने दि. ११ मार्च पासून सुरू झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबिराचा आज दुपारी ४ वाजता माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली समारोप समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.मिलिंद निकुंभ, प्रति कुलगुरू महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक, डॉ बाळासाहेब पवार, अध्यक्ष स्थायी समिती, आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक, डॉ. देवेंद्र पाटील, संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, (एम.यु.एच.एस.) नाशिक आदी उपस्थित राहणार आहेत. याच वेळी विद्यापीठाच्या स्थायी समितीच्या अध्यक्षपदी डॉ बाळासाहेब पवार आणि विद्यार्थी कल्याण मंडळाच्या संचालकपदी डॉ देवेंद्र पाटील यांची निवड झाल्याबद्दल माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे. सरपंच अंबादास गुजर मंझेरी, ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज मंझेरीकर, दिनकर कदम, विलास बडगे, अरुण डाके, नानासाहेब काकडे, महाविद्यालयाचे सल्लागार डॉ.अरुण भस्मे हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. गणेश पांगारकर यांनी केले आहे.

वडवणी तालुक्यातील ७७९ नवसाक्षर देणार साक्षरतेची परिक्षा

तालुक्यातील ५२ परिक्षा केंद्रांवर नियोजन; वाचन, लेखन, संख्यात्मक शिक्षणाचे होणार मूल्यमापन

वडवणी (प्रतिनिधी)-नवभारत साक्षरता अभियानांतर्गत उद्या रविवार दि.१७ मार्च २०२४ रोजी वडवणी तालुक्यातील ७७९ नवसाक्षरांची परिक्षा होत असून पोरांसोबत धडे गिरविलेल्या पालकांची कसोटी यामुळे लागणार आहे. या परिक्षेच्या अनुषंगाने सर्वतोपरी तयारी पूर्ण झाली असल्याचे वडवणी तालुका गटसाधन केंद्र यांच्यावतीने सांगण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत वडवणी तालुक्यात शहरी आणि ग्रामीण भागातून सर्व असाक्षरांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. केंद्र सरकारचे सन २०२७ पर्यंत १०० टक्के नागरिकांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट आहे. वडवणी तालुक्यात सन २०२२-२३ व २०२३-२४ साठी ८७४ असाक्षर नोंदणीचे उद्दिष्ट दिलेले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामधील साक्षरता कार्यक्रमासंबंधी टास्कनुसार हे सर्वेक्षण झालेले होते. तालुक्यात २०२२-२३ व २०२३-२४ यासाठी उल्हास पव्दारे ७७९ असाक्षरांची नोंदणी करण्यात आलेली आहे. तसेच त्यांना शिकवण्यासाठी अनेक स्वयंसेवकांचीही नोंदणी झाली होती. या सर्वेक्षणानंतर वडवणी तालुक्यात साक्षरतेचे वर्ग सुरु केले होते. या वर्गात शिकलेल्या सर्व नवसाक्षरांची रविवार दिनांक १७ मार्च २०२४ रोजी परिक्षा होत असून या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत केंव्हाही आपल्या परिक्षा केंद्रावर उपस्थित राहून नवसाक्षरांनी सदरील परिक्षा द्यावी. सर्व नवसाक्षर परिक्षार्थी यांनी या परीक्षेला येतांना आपले आधार कार्ड व पासपोर्ट साईजचा रंगीत फोटो सोबत आणावा. परिक्षा उत्तीर्ण होणाऱ्यांना शासनाच्या वतीने साक्षर झाल्याचे प्रमाणपत्र मिळणार आहे. दरम्यान नवसाक्षरांची ज्या शाळेतून नोंदणी झालेली आहे, तीच शाळा परिक्षा केंद्र असेल वडवणी तालुक्यातील अशा ५२ परिक्षा केंद्रांवर ही परिक्षा संपन्न होणार आहे. संबंधित शाळेचे मुख्याध्यापक हे केंद्र संचालक असणार आहेत. नवसाक्षरांची मूलभूत व संख्या विज्ञान ही एकूण १५० गुणांची परिक्षा होत असून यामध्ये वाचन, लेखन व संख्याज्ञान या विषयांची परिक्षा प्रत्येकी ५० गुणांची होणार आहे. सदरील परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक विषयात किमान १७ गुण आवश्यक आहेत. म्हणजेच एकूण १५० गुणांपैकी ५१ गुण इतके उत्तीर्ण होण्याकरिता प्राप्त करणे आवश्यक आहे.

भरारी पथकांची नियुक्ती

वडवणी तालुक्यातील ७७९ नवसाक्षरांची परिक्षा दिनांक १७ मार्च रोजी संपन्न होणार आहे. डायट व शिक्षणाधिकारी योजना विभागाच्या वतीने ही परिक्षा घेण्यात येणार असून यासाठी जिल्हास्तरावरुन देखील भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच ७ क्षेत्रीय अधिकारी व १५ भेट अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून एकूण ५२ परिक्षा केंद्रांवर यांच्या भेटी, देखरेख व नियंत्रण असणार आहे अशी माहिती वडवणीचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी दिली आहे.